(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XII / Issue – III ISSN 2277-8063

# नवे शैक्षणिक धोरण : आव्हाने व अडचणी

**प्रो. उल्का मानसिंग घार्गे,** मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय इस्लामपूर.

---

**सारांश:-**

नवीन शैक्षणिक धोरणाचे यश हे शैक्षणिक सुधारणामध्ये योगदार देण्याची राज्यांची क्षमता यावर अवलंबून आहे. भारतातील शिक्षणाचा प्रचार आणि नियमन करण्यासाठी भारत सरकारने तयार केलेले धोरण होय शिक्षण हे जीवनभिमुख आणि अधिक रोजगाराभिमुख होण्यावर भर दिला आहे. विद्यार्थी कंद्रित मॉडेल, रोजगारक्षमता सुधारण्यासाठी स्थानीक उद्योगात इंटर्नशिपची संधी दिली जाईल. शैक्षणिक बदल व परिवर्तन तळागाळापर्यंतच्या हस्तक्षेपामुळे शक्य आहे. विद्यार्थ्याच्या मानसीकतेचा विचार शिक्षणात झाला पाहिजे. मुलाची कुवत व आवडीनुसार शिक्षण देणे मल्टीडिसिप्लनरी अभ्यासक्रम-विद्यार्थ्याला एकाच वेळी वेगवेगळे विषय शिकता येतील त्यामुळे आर्थिक अडचणी किंवा इतर कारणाने शिक्षण सोडण्याचे प्रमाण कमी होईल. सार्वत्रिक प्रवेश/आणि समानता या दृष्टीने सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी व भौगोलिक स्थानाचा विचार न करता दर्जेदार शिक्षण सर्वासाठी खुले भारताच्या अफाट लोकसंख्येला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्याद्वारे असंख्य लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या शैक्षणीक धोरणाची अंमलबजावणी कशी होते यावरून ठरणार आहे. ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाची असणारी स्थिती पाहता. दोन्हीत असणारी साधने व पायाभूत सुविधा यामुळे शिक्षणात समानता आणणे हे आव्हानच आहे. नवे बदल घडवण्यासाठी माणसे आणि आर्थिक पाठबळ महत्तवाचे असले तरीही मनुष्यबळ, पालक, शिक्षक, विद्यार्थी सर्वांच्या मानसीकतेत बदल घडवून आणावा लागणार आहे

## भारतातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती :-

कोणत्याही शिक्षकाने विद्यादानाचे काम करताना निष्ठेने गुणवत्ता टिकवण्याची जबाबदारी ही पूर्णपणे शिक्षकांची आहे. या कामात शिक्षकाला इतर संबधीत घटकाकडून योग्य ते सहकार्य मिळाले पाहिजे. आजकालच्या विद्यार्थ्यामध्ये मात्र पैसे देऊन डिग्री घ्यायची अशी मानसिकता वाढीस लागत आहे व ती बदलणे गरजेचे आहे. विद्यार्थी व शिक्षक दोघांनीही वाचन, मनन, चिंतन करणे आवश्यक बाब आहे. शिक्षक स्वत: संशोधन, वाचन, लेखन या गोष्टी प्रथम आत्मसात करीत असेल तर विद्यार्थी वर्ग हा शिक्षकांचे अनुकरण करतो. मात्र आज परीक्षेतील गुणांना शैक्षणीक गुणवत्ता मानले

जाते. शिक्षण सम्राटांनी भरमसाठ शुल्क व देणग्या घेऊ शिक्षणाचा नुसता बाजार मांडला आहे. आजचे शिक्षण निव्वळ पोटार्थी झाले आहे. निव्वळ पुस्तकी ज्ञान मिळविणे तसेच सत्ता, संपत्ती, रोजगार, करिअर घडवणे या उद्देशपूर्तीसाठी शिक्षण घेतले जात आहे.

## पार्श्वभूमी :-

भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडापासून विविध आयोग जसे डॉ. राधाकृष्णन आयोग, मुदलियार आयोग, कोठारी आयोग शिक्षणक्षेत्रात सुधारेणसाठी अंमलात आणले गेले.

- पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968
- दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986
- मोफत व सक्तीचे शिक्षण 2009 (RTE Act- 2009)
- नवीन राष्ट्रीय शेक्षणीक धोरण 2020

29 जुलै 2020 रोजी नवीन राष्ट्रीय शैक्षणीक धोरण जाहीर केले. National Eduation Policy, 2020 प्रत्यक्षात 2023 पासून अंमलबजावणी होत आहे.

## प्रस्तावना:

सशक्त शैक्षणिक व्यवस्था उभारणे हे या शैक्षणिक धोरण 2020 उद्दिष्ट आहे. सर्वांसाठी गुणवत्तेचे शिक्षण आणि समान गुणवत्तेचे शिक्षण तसेच सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षण संधी ही उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या हेतूने नवीन शैक्षणिक धोरण 2020 जाहीर केले आहे. दैनंदिन आयुष्यात येणाऱ्या अनुभवाचा वापर शिक्षणात केला जावा हा नविन शैक्षणिक धोरणात उल्लेख आहे. नवीन शैक्षणिक धोरणाचे यश हे शैक्षणिक सुधारणामध्ये योगदार देण्याची राज्यांची क्षमता यावर अवलंबून आहे. नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 भारतातील शिक्षणाचा प्रचार आणि नियमन करण्यासाठी भारत सरकारने तयार केलेले धोरण होय. नवे शैक्षणिक धोरण 2020 नक्कीच एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे. शिक्षण व्यवस्थेतील अनेक संघटना सामोरे जाण्याचे सर्वात आव्हानात्मक कार्यही या धोरणाद्वारे आपणास करायचे आहे. आपल्या देशाची प्राचीन संस्कृती व उदयाचे भविष्य या दोन्ही विचाराचा एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न म्हणजे नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 होय. यात शिक्षण हे जीवनभिमुख आणि अधिक रोजगाराभिमुख होण्यावर भर दिला आहे. विद्यार्थी कंद्रित मॉडेल, रोजगारक्षमता सुधारण्यासाठी स्थानीक उद्योगात इंटर्नशिपची संधी दिली जाईल. शैक्षणिक बदल व परिवर्तन तळागाळापर्यंतच्या हस्तक्षेपामुळे शक्य आहे.

## नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 प्रमुख शिफारशी :-

- लवकर बालसंगोपन आणि शिक्षण
- अभ्यासक्रम फ्रेमवर्क

- उच्च शैक्षणिक संस्था(मान्यता आणि संरचना)
- वित्तपुरवठा शिक्षण
- शिक्षण हक्क कायदा(RTE 2009 कायदा)
- राष्ट्रीय शिक्षण मिशन(संवाद आणि आयटीद्वारे)
- व्यावसायिक अभ्यासक्रम
- नॅशनल रिसर्च फाउंडेशन
- तीन भाषांचे सूत्र
- शालेय परीक्षा
- शिक्षण प्रशासन

**एकविसाव्या शतकातील शिक्षणाची उद्दिष्टे :-**

- चारित्र्यसंपन्न व शिक्षणाप्रती विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करणे.
- ज्ञानप्राप्ती हे अंतिम उद्दिष्टे असावे.
- गुणवत्ता वाढीस लावणे. शिक्षणाप्रती ओढ निर्माण व्हावी.
- पुस्तकातून बाहेर पडून शिक्षण हे प्रायोगिक झाले पाहिजे.
- शिक्षणाप्रती व विद्यार्थ्यांप्रती तळमळ असणारे शिक्षक निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांना जगण्यासाठी उपयोगी असे कौशल्य आधारीत शिक्षण मिळावे.
- विद्यार्थ्यांच्या मानसीकतेचा विचार शिक्षणात झाला पाहिजे.
- मुलाची कुवत व आवडीनुसार शिक्षण देणे
- एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलू शकरणारे शिक्षण हवे.
- जागतिक स्तरावर ज्ञानाच्या बाबतीत भारताला महासत्ता बनविणे

**नवे शैक्षणिक धोरण 2020 तत्वे/सिध्दांत :-**

- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या ज्या काही सुप्त क्षमता आहेत त्या शोधून विकसीत करणे.
- शिक्षक व पालक या दोन्ही स्तरावर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अभ्यासाबरोबर इतर क्षेत्रासाठी प्रोत्साहन देणे.
- विद्यार्थ्यांना आपली आवड, रूची, प्रतिभेनुसार अभ्यासक्रम निवडू शकतील
- बहुशाखीय( Milti disciplinary) शिक्षणप्रणाली विकसीत करणे.
- संकल्पना समजून घेऊन, कल्पकता आणि तार्किक विचार करण्यास प्रेरणा देणे.
- स्वायत्ता, सुशासन, सुशक्ती करणाच्या माध्यमातून चौकटीबाहेरील विचारांना चालना देणे.
- उत्कृष्ट दर्जाचे संशोधन, पाचवीपर्यंत शिक्षण हे मातृभाषेत शिकवले जाईल.
- उच्च शिक्षणात एकूण सकल पट नोंदणी (Gross enrolment Ratio) 2035 पर्यंत 50% उद्दिष्ट आहे.
- ई-कोर्सेस प्रादेशिक भाषेत सुरू केले जातील.
- मल्टीडिसिप्लनरी अभ्यासक्रम-विद्यार्थ्याला एकाच वेळी वेगवेगळे विषय शिकता येतील त्यामुळे आर्थिक अडचणी किंवा इतर कारणाने शिक्षण सोडण्याचे प्रमाण कमी होईल.

- शिक्षणातील गुंतवणूक जी.डी.पी च्या 6% करण्याचे ध्येय.
- शिक्षण मंत्रालयाने ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट नवीन उपक्रम चालू केला आहे.
- विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी राष्ट्रीय मूल्यमापन केंद्र(पारख) PARAKH ची निर्मिती व यामुळे परदेशी विद्यापीठांना भारतात कॅम्पस उभारण्याचा मार्ग मोकळा होणार.
- अध्यापन आणि शिक्षण, शैक्षणिक प्रशासन यामध्ये अदयावत तंत्रज्ञान वापरण्यावर भर.
- सार्वत्रिक प्रवेश/आणि समानता या दृष्टीने सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी व भौगोलिक स्थानाचा विचार न करता दर्जेदार शिक्षण सर्वांसाठी खुले.
- शिक्षकांच्या व्यवसायीक विकास तसेसच शिक्षणातील संशोधन आणि नावीन्यपूर्णतेला महत्त्व् देते.

**नवे शैक्षणिक धोरण 2022 आव्हाने/अडचणी :-**

**1)** उच्च शिक्षण व्यवस्थेचा आवाका मोठा आहे. एआयएसएचई 2021 च्या अहवालानुसार भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात 1000 विद्यापीठे, 39931 महाविद्यालये, 10725 स्वायत्त संस्था, 3.74 करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अशा या विविधता असलेल्या राज्यामंधील सर्व घटकांना एकत्र आणून, शिक्षणाविषयी जबाबदारीची भावना निर्माण करणे ही (NEP) धोरण राबवतानाचे मोठे आव्हान आहे.

**2)** भारताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये निधीची कमतरता आहे. संपूर्ण व्यवस्था ही नोकरशाहीवर आधारलेली आहे व नवीन कल्पना आणि विकास क्षमतेचस शिक्षण व्यवस्थेत प्रतिकूल वातावरण आहे असे मत के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीने दिले आहे.

**3)** नवीन राष्ट्रीय धोरण हे मुख्यकरून केंद्र आणि राज्यांमधील सहकार्यावर अवलंबून आहे कारण शैक्षणिक उपक्रम राज्यसरकारकडून चालवले जातात. नव्या शैक्षणिक धोरणातील अनेक तरतुदीवर विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या अनेक राज्यांनी आक्षेप घेतले आहेत. उदा. तमिळनाडू या राज्याने नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी न करण्याची भूमिका घेतली आहे.

**4)** जवळपास 70% उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था खाजगी आहेत. या खाजगी क्षेत्रात आर्थिक संसाधने व नावीन्यपूर्ण कल्पनेने सक्षम असतात. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी खाजगी क्षेत्राचे योगदान मिळवणे अवघड बाब आहे.

**5)** सन 2020-21 मध्ये शिक्षणावरील खर्च 99,311 कोटीवरून 2021-22 मध्ये 93,224 कोटी इतका कमी झाला. पण येत्या काळात शिक्षणावरील खर्च कसा वाढवता येईल यासाठी कोणतीही योजना सरकारकडे नाही.

**6)** भारताच्या अफाट लोकसंख्येला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्याद्वारे असंख्य लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या शैक्षणीक धोरणाची अंमलबजावणी कशी होते यावरून ठरणार आहे.

**7)** अंमलबजावणीच्या दृष्टीने राजकीय पाठिंबा गरजेचा आहे.

**8)** 5वी पर्यंतचे शिक्षणाचे माध्यम मातृभाषेत असावे असा महत्तवपूर्ण निर्णय या धोरणात घेतला आहे. जे या भाषेशी परिचीत नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही गोष्ट एक अडचण समजावी लागेल.

**9)** हे शैक्षणिक धोरण यशस्वी अंमलबजावणीसाठी योग्य निधीची गुंतवणूक आवश्यक आहे. जसे पायाभूत सुविधा, शिक्षक प्रशिक्षण, संशोधनासाठी गुंतवणूक आवश्यक आहे.

**10)** ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाची असणारी स्थिती पाहता. दोन्हीत असणारी साधने व पायाभूत सुविधा यामुळे शिक्षणात समानता आणणे हे आव्हानच आहे.

**11)** उत्तम व दर्जेदार शिक्षणव्यवस्था देशभर राबवायची असेल तर समृध्द आणि संपन्न मनुष्यबळ उपलब्ध करणे तसेच गुणवत्ता पूर्ण शिक्षक निर्माण करणे हे मोठे आव्हानच आहे.

**12)** या शैक्षणिक धोरणानुसार, उच्च शिक्षणही मातृभाषेत दिले जाणार आहे. सर्व अभ्यासक्रम, पाठयक्रम मातृभाषेत आणण्याचे आव्हान आहे.

**13)** इंग्रजी भाषेला प्रतिष्ठा असल्याने इंग्रजी भाषेचे महत्तव जनमाणसात रूजले आहे. मातृभाषेतील शिक्षणाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे आव्हान.

**14)** एकाच वेळी इतक्या मोठया व्यवस्थेला गतिमान बनवणे त्यांच्यामार्फत सारे बदल पोहचवणे हे सरकार समोर आव्हान आहे.

**15)** या शैक्षणीक धोरणात ऑनलाईन शिक्षणावर भर देण्यात आला आहे. परंतु आजही राज्यात काही ठिकाणी विशेषत्: ग्रामीण, दुर्गम भागात, वनवासी भागात इंटरनेट सुविधा नाहीत.

**16)** खाजगीकरणाला उत्तेजन तसेच अधिकाधिक प्रमाणात कॉलेजना स्वायत्तता देण्याची धोरणातील शिफारसीमुळे विद्यार्थी वर्गाला उच्च शिक्षण हे दिवसेंदिवस अधिक महाग होण्याची भीती निर्माण झाली आहे. तसेच परकीय विद्यापीठांना भारतात परवानगी देण्याची शिफारस उच्च शिक्षण महाग करणारी आहे.

**17)** नवे बदल घडवण्यासाठी माणसे आणि आर्थिक पाठबळ महत्त्वाचे असले तरीही मनुष्यबळ, पालक, शिक्षक, विद्यार्थी सर्वांच्या मानसीकतेत बदल घडवून आणावा लागणार आहे.

आर्थिक परिस्थितीपेक्षा निरस शैक्षणिक वातावरणामुळे शाळेत मुलांची गळतीचे प्रमाण जास्त आहे. गरिबांना जाणून आणि समजून घेत शिक्षणाची प्रक्रिया झाली तरच मुले शिक्षणात टिकतील अन्यथा अशीच गळती पुढेही चालतच राहील. शैक्षणिक क्षेत्र हे नफा व पैसे मिळवण्याचे साधन नाही असे राज्यकर्त्यांनी वेळीच लक्षात घेणे गरजेचे आहे. आजकाल जी शिक्षणाच्या दर्जाबाबत उदासिनता, दुर्लक्ष झाले आहे, त्यांचा खूप मोठा परिणाम आपल्या पुढील पिढीला भोगावा लागणार आहे. शिक्षण या मूलभूत घटकांवर कोणत्याही समाजाचा आणि देशाचा सर्वांगीण विकास अवलंबून आहे. भारत हा सर्वात तरूण लोकसंख्या असलेला देश आहे. या तरूणांना उच्च दर्जाच्या शैक्षणिक संधी उपलब्धतेवर भारताचे भविष्य अवलंबून आहे. लोकशाही समाजात प्रत्येक नागरिकाला त्यांच्या क्षमतांशी सुसंगत असे दर्जेदार शिक्षण मिळावे हा मूलभूत अधिकार आहे. शिक्षणात शारीरिक, मानसिक , नैतिक विकासाबरोबर अध्यात्मिक विकासावर जास्त भर दयावा असे रवींद्रनाथ टागोर यांना वाटते. शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या बौध्दिक पातळीशी समरस होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विद्यार्थी स्वानुभावाने शिकतात पण त्यासाठी अनुकूल वातावरण शिक्षकाने निर्माण केले पाहिजे. "पुस्तकातून शिका पण त्या ज्ञानाला शारीरिक श्रमाची जोड दया" असा डॉ. झाकीर हुसेन यांचा आग्रह होता. देशाच्या आर्थिक औद्योगीक विकासात तांत्रिक शिक्षण महत्त्वाची भूमिका निभावू शकेल यावर स्वामी विविकानंदानी जोर दिला होता.

**संदर्भ :-**


1) प्राध्यापक आणि शैक्षणिक व्यवस्थापन, डॉ. लक्ष्मण महामने, विद्या प्रितम प्रकाशन, पुणे.

2) शिक्षणशास्त्र, डॉ. भीमसेन रंगाचार्य जोशी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

3) शिक्षण विचार, प्राचार्य अल्बर्ट रेमेत डिसूझा, शिक्षण मंडळ, कराड.

4) नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 www.samaveshitshikshan.com

5) नवे शैक्षणिक धोरण आणि पाच आव्हाने www.orfonline.org

6) राष्ट्रीय शैक्षणीक धोरण www.byjusexamprep.com

7) नवीन राष्ट्रीय शैक्षणीक धोरण 2020: स्वरूप, संधी आणि आव्हाने (15/04/2023) www.dnyantarangini.com